बृहन्मुंबईतील बंद /आजारी कापड गिरण्यांच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या घरांच्या सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या मृत गिरणी कामगारांच्या वारसांनी केलेल्या हक्कसोड विलेखावर आकारावयाच्या मुद्रांक शुल्काबाबत...

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः-मुद्रांक-२०१३/प्र.क्र.३०९/म-१
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांकः- ५ जुलै, २०१३

संदर्भ :- शासन परिपत्रक, गृहनिर्माण परिपत्रक क्र.बैठक-१०११/प्र.क्र.३८४/
भाग-४/पुबां/३/गृनिप, दिनांक १५ मार्च, २०१३

**शासन परिपत्रक**

बृहन्मुंबईतील बंद /आजारी ५८ कापड गिरण्यांपैकी १८ गिरण्यांच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या ६९४८ घरांपैकी ६९२५ घरांची सोडत काढण्यात आली असून सदर सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या मृत गिरणी कामगारांच्या वारसांपैकी एकाच वारसाला ग्राहय धरुन त्याला घराचे वाटप करण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण विभागाच्या उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर परिपत्रकातील परि.क्र.२.२ (क) नुसार मृत गिरणी कामगारांच्या सर्व कायदेशीर वारसदारांनी त्या घराच्या बाबतीत त्यांचे हक्क आणि हितसंबंध त्या मृत गिरणी कामगाराच्या विधवा पत्नीच्या नांवे सोडून दिल्याचे वैयक्तिक अथवा संयुक्तपणे केलेला हक्कसोड विलेख (Deed of relinquishment) आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. वरीलप्रमाणे हक्कसोड विलेखाच्या (Deed of relinquishment) संदर्भात मुद्रांक शुल्काच्या आकारणीबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

अ) केवळ मृत गिरणी कामगारांच्या कायदेशीर वारसाला म्हाडामार्फत घराचे वाटप करताना घ्यावयाच्या हक्कसोड विलेखाचा दस्त म्हाडाकडून प्राप्त व नोंदणी महानिरीक्षक यांनी मान्य केलेल्या प्रारुप नमुन्यानुसारच असल्याची खातरजमा म्हाडाच्या अधिका-यांनी करावी व त्याप्रमाणे कागदपत्रासोबत सक्षम प्राधिक-याचे प्रमाणपत्र दयावे.

आ) नोंदणी व मुद्रांक विभागातील दुय्यम निबंधकांच्या /मुद्रांक कार्यालयात वरीलप्रमाणे विहित नमुन्यातच हक्कसोड विलेखाचा दस्त प्रमाणपत्रासहीत प्राप्त झाल्यावरच महाराष्ट्र मुद्रांक

अधिनियम (१९५८ चा साठ) मधील अनुसूची -१ मधील ५२ (अ) नुसार मुद्रांक शुल्काची आकारणी करण्यात यावी.

इ) नोंदणी व मुद्रांक विभागातील दुय्यम निबंधकांच्या /मुद्रांक कार्यालयात वरीलप्रमाणे विहित नमुन्यात हक्कसोड विलेखाचा दस्त नसल्यास त्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा साठ) तरतूदीनुसार यथोचित मुद्रांक शुल्क आकारण्यात यावे.

( राजेश नार्वेकर )
उपसचिव

प्रति,

१) सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
३) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे,
४) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई,
५) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
६) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सचिव (मदत व पुनर्वसन), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
८) उपसचिव (म-१) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
९) निवड नस्ती, कार्यासन म-१.